जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-परीक्षा/हस्तदेय/२०१९ दि.१८ जुलै, २०१९

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

जळगाव दि.१८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत अभियांत्रिकी अभ्यासक्रमास सीजीपीए पॅटर्न (२०१२-१३) नुसार प्रवेशीत ज्या विद्यार्थ्यांचे द्वितीय व तृतीय वर्ष मिळून १५ किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत असे विद्यार्थी सन २०१९-२० मध्ये चतुर्थ वर्षासाठी प्रवेशास पात्र राहतील असा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील काही अभियांत्रिकी महाविद्यालये डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठाशी सन २०१७-१८ पासून संलग्नित झाले आहेत. गतवर्षी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये कबचौउमवि अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांची (तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांसह) सीजीपीए २०१२-१३ या अभ्यासक्रमाची तृतीय वर्षाची शेवटची बॅच होती त्यामुळे विद्यापीठाने या पॅटर्ननुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांचे प्रथम व द्वितीय वर्ष मिळून १५ किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत. असे विद्यार्थी तृतीय वर्षाच्या वर्गास सन २०१८-१९ या वर्षी प्रवेशासाठी पात्र राहतील असा निर्णय घेतला होता.

यंदा शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कबचौउमवि अंतर्गत असलेल्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांची (तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांसह) चतुर्थ वर्षाच्या वर्गाची शेवटची बॅच असणार आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १७ जुलै, २०१९ रोजीच्या बैठकीत चर्चा झाली आणि त्यामध्ये सीजीपीए पॅटर्न २०१२-१३ नुसार ज्या विद्यार्थ्यांचे द्वितीय व तृतीय वर्ष मिळून १५ किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत असे विद्यार्थी सन २०१९-२० मध्ये चतुर्थ वर्षासाठी प्रवेशास पात्र राहतील असा निर्णय घेण्यात आला. ही सवलत सीजीपीए पॅटर्न २०१२-१३ नुसार अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थ्यांना फक्त शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये चतुर्थ वर्षाच्या प्रवेशासाठी लागू राहील. सन २०१७ आणि २०१८ पॅटर्ननुसार प्रवेशीत विद्यार्थ्यांना एटीकेटीचे नियम अभ्यासक्रमात उल्लेख केल्या प्रमाणे लागू राहतील अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-परीक्षा/हस्तदेय/२०१९ दि.१८ जुलै, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
----------------------

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध् करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी